PACHORA TALUKA CO-OPERATIVE EDUCATION SOCIETY'S

Affilated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon[M.S]
Established in 1970

श्री.शेठ मुरलीधरजी मानसिंगका
साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पाचोरा जि.जळगांव
फोन नं.०२५९६-२४५३१४ निवास.२४५१००

Shri Seth Murlidharji Mansingaka
Arts,Science & Commerce College
Pachora Dist.Jalgaon
Mobile No.9420788336

www.ssmmcollege.ac.in Email Id- info@ssmmcollege.ac.in

**वाचा:-** 1.**मा.सहसंचालक,उच्च् शिक्षण जळगांव विभाग,जळगांव यांचे पत्र** E-Comp No.3236074
**File No.: JDJAL-11(11)/10/-JDHEJAL-G IN दि.२४/०४/२०२६**
2.**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४६/ई-१३०६२१४/मशि-२ दि.०६/०३/२०२६**

# -:: अंत्यत महत्वाची सुचना ::-

वरीष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की,संदर्भीय पत्रान्वये एच.टी सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या **ई-कुबेर प्रणालीसमवेत** इंटिग्रेशन करणेबाबत संदर्भीय शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन महाविद्यालयातील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे माहितीची तपासणी करणेकामी **विशेष शिबीराचे Special Drive** आयोजन उद्या **दि.02/05/2026 शनिवार** रोजी **श्री.ऋषिकेश ठाकूर,मुख्य लिपीक** यांच्या कक्षात करण्यात आले आहे.-

| | | |
|---|---|---|
| १. बँक खाते क्रमांक | २. आधार कार्ड क्रमांक | ३. पॅन कार्ड क्रमांक |
| ४. ई-मेल आयडी | ५. मोबाईल क्रमांक | ६. सेवार्थ प्रणालीमधील अद्यावत माहिती |

तसेच **एचटीई सेवार्थ प्रणालीत नाव व बँक तपशीलामधील दोघांमध्ये साम्य असणे आवश्यक** आहे, (उदा. स्वःताचे वडिलांचे आणि आडनांव) ज्या कर्मचारी नावातील स्पेलींग किंवा अन्य माहिती चुकीची असेल त्यांनी सदर माहिती अद्यावत करण्याबाबत तात्काळ आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज सादर करावा. तसेच जे कर्मचारी खालीलप्रमाणे तपासणी करणेकामी अनुउपस्थित राहतील. त्यांचे चुकीच्या माहितीअभावे नियमत वेतन अनुदान ई-कुबेर प्रणालीद्वारे न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कर्मचारी यांची राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | संवर्ग | शिबीराची वेळ |
|---|---|---|
| 1 | शिक्षक कर्मचारी | सकाळी 08:00 ते 09:00 पर्यंत |
| 2 | शिक्षकेतर कर्मचारी | सकाळी 09:00 ते 10:00 पर्यंत |

**टिप:- सर्व कर्मचाऱ्यांनी सोबत येतांना E-KYC प्रपत्र सोबत आणावे.**

**दि.०१/०५/२०२६**

श्री.शे.मु.मा.साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाचोरा जि.जळगांव

**डॉ.वासुदेव सोमाजी वले**
प्राचार्य
श्री.शेठ मुरलीधरजी मानसिंगका
साहित्य,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पाचोरा-४२४२०१,जि.जळगांव

I:\SSMM\Notice\सेवार्थ डाटा.docx

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक**
**उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत, ग्राहक न्यायालयामागे, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव 425001.
दुरध्वनी क्रमांक (०२५७-२२३८५१०) Web Site- jdhejalgaon.org.in E-mail-jdhe_jal@yahoo.co.in

**E-Comp. No.: ३२३६०७४ File No.:JDJAL-१३०११(११)/११०/२०२६-JDHEJAL-G IN**

## अत्यंत महत्वाचे परिपत्रक

**प्रति,**

**कुलसचिव,/ वित्त व लेखा अधिकारी**
कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव
**सर्व प्राचार्य,**
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, तसेच समाजकार्य
महाविद्यालये, जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्हा

**विषय:-एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीसमवेत इंटिग्रेशन करणेबाबत.**

**संदर्भ-**१. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2025/प्र.क्र.46/ई-1306214/मशि-2 दि.६.३.२०२६.
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक I/1789440/2026 दि.17.03.2026.
३. मा.श्री. शिवाकृष्ण येनागंटी, प्रकल्प व्यवस्थापक, कस्टमाईज्ड सेवार्थ यांचा दिनांक.१८.३.२०२६ रोजीचा ई-मेल.
४. संचालनालयाचे पत्र क्रमांक I/1792868/2026 दि.१८.३.२०२६.

उपरोक्त विषयास व संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, एच.टी सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीसमवेत इंटिग्रेशन करणेबाबत संदर्भीय शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन पुढील कार्यवाहीबाबत मा. श्री. शिवाकृष्ण येनागंटी प्रकल्प व्यवस्थापक, कस्टमाईज्ड सेवार्थ यांनी दिनांक २०.४.२०२६ रोजी सर्व विभागीय सहसंचालक तसेच संबंधित कर्मचारी यांच्यासोबत ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

सदर कार्यशाळेच्या अनुषंगाने विद्याठातील तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील एचटीई सेवार्थ हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सर्व कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे संपूर्ण माहितीची तपासणी करून सदर माहितीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये प्रामुख्याने तपासणी करावयाची माहिती खालीलप्रमाणे.

**१. बँक खाते क्रमांक, २. आधार कार्ड क्रमांक, ३. पॅन कार्ड क्रमांक, ४.ई-मेल आयडी, ५. मोबाईल क्रमांक. ६. सेवार्थ प्रणालीमधील अद्यावत माहिती**

वरील नमूद कागदपत्रानुसार एचटीई सेवार्थ प्रणालीत नाव व बँक तपशीलामधील दोघांमध्ये साम्य असणे आवश्यक आहे, (उदा. स्व:ताचे वडिलांचे आणि आडगाव) ज्या कर्मचारी नावातील स्पेलींग किंवा अन्य माहिती चुकीची असेल त्यांनी संबंधित कर्मचारी यांचे वरील नमूद कागदपत्रे तसेच एचटीई सेवार्थ प्रणालीमधील अद्यावत माहिती सादर करावी.

तसेच एच.टी सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीसमवेत इंटिग्रेशनसाठी अद्यावत करण्यासाठी आवश्यक असल्याने सदर कर्मचारी यांची माहिती चुकीची असल्या कारणामुळे संबंधित कर्मचारी यांचे नियमत वेतन अनुदान ई-कुबेर प्रणालीद्वारे न-झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आहरण व सवितरण अधिकारी व संबंधित कामकाज पाहणारे कर्मचारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच प्रस्तासोबत वरील नमूद १ ते ६, क्रमांकाचे कागदपत्रे व सोबत दिलेल्या विवरणपत्रातील माहितीसह **दि.०५.०५.२०२६** रोजी पर्यंत या कार्यालयात सादर करावी.

Digitally signed by
Parag Purushottam Masram
Date: 24-04-2026 16:36:50
**(डॉ. पराग मसराम)**
सहसंचालक
उच्च शिक्षण,जळगांव विभाग, जळगांव

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर**
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे

## विभागाचे नांव- सहसंचालक उच्च शिक्षण जळगांव विभाग जळगांव

**विद्यापीठ तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील कार्यरत असलेले तसेच एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये वेतन घेत असलेल्या कर्मचारी यांची सेवार्थ मधील व कागदपत्रावरील एकसमान (साम्य) असलेल्या कर्मचारी यांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात यावी.**

**DDO Code-**

**College Name -**

| Sr. No | Employee name | Designation | Sevaarth Id | Date Of Birth | Date of Appointment | Date of Retirement | Mobile number linked to Aadhaar PAN Bank Account | Adhar No & Name | Pan Card No. & Name | Bank Account No & Name | Bank IFC Code | PRAN No & Name | HTE Sevaarth The name mentioned is English. | Notes (indicate any changes in the information) and a copy And HTE Sevaarth Draft should be attached. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

प्राचार्य नाव-

स्वाक्षरी

टिप- वरील नमूद केलेली माहिती मध्ये तफावत असेल तर कार्यालयाकडून ज्या माहितीमध्ये बदल होईल त्या माहितीचा बदल करून घेण्यासाठी संपूर्ण कागदपत्रे सादर करावीत, भविष्यात सदर माहितीमध्ये कोणताही बदल होणार नाही त्यासाठी सर्वांनी एकदा संपूर्ण माहिती तपासून खात्री करावी.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, पुणे-४११०१६.
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.अमवि/२०२४/ ई-कुबेर /ई..१९१५४२९ / /मवि -२ दि. ०४.२०२६

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण.

**विषय-** एच.टी.ई.सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीसमवेत इंटिग्रेशन करणेबाबत ऑनलाईन कार्यशाळा.
दि.२०.०४.२०२६ वेळ सायं- ०४.०० वा.

**संदर्भ-**१. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४६/ई-१३०६२१४/मशि-२ दि.०६.०३.२०२६.
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक I/१७८९४४०/२०२६ दि.१७.०३.२०२६.
३. मा.श्री.शिवाकृष्ण येनागंटी,प्रकल्प व्यवस्थापक,कस्टमाईज्ड सेवार्थ यांचा दिनांक १८.०३.२०२६ रोजीचा ई-मेल.
४. संचालनालयाचे पत्र क्रमांक I/१७९२८६८/२०२६ दि.१८.०३.२०२६.

उपरोक्त विषयास व संदर्भीय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की एचटी सेवार्थ प्रणालीचे बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणालीसमवेत इंटिग्रेशन करणेबाबत संदर्भीय शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे.त्यास अनुसरुन सदरबाबत विभागीय सहसंचालक स्तरावरुन करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत श्री. मा.श्री.शिवाकृष्ण येनागंटी ,प्रकल्प व्यवस्थापक,कस्टमाईज्ड सेवार्थ हे आज दिनांक २०.०४.२०२६ रोजी सायं. ०४.०० वा. ऑनलाईन कार्यशाळा घेणार आहेत. सदर कार्यशाळेस आपण स्वत: तसेच आपल्या कार्यालयातील एचटीई सेवार्थ हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यासह उपस्थित रहावे ही विंनती.कार्यशाळेसाठी आवश्यक ती लिंक व पासवर्ड कार्यशाळेपुर्वी पाठविण्यात येईल.

Digitally signed by
BAGAL ASHOK PARMESHWAR
Date: 20-04-2026 12:00:04

अशोक बागल)
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१६.

प्रत-

१. मा.श्री.शिवाकृष्ण येनागंटी,प्रकल्प व्यवस्थापक,कस्टमाईज्ड सेवार्थ,महा.आयटी मुंबई यांना माहितीस्तव.

**एचटीई सेवार्थ प्रणालीचे वित्त विभागाच्या बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर प्रणाली समवेत इंटिग्रेशन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण - २०२५/प्र.क्र.४६/ई-१३०६२१४/मशि-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ मार्च, २०२६

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. सेवार्थ-२०१५/प्र.क्र.२७८/२०१५/आस्था-१, दि. २१.०८.२०१५

(२) शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०/२०२४/कोषा प्रशा-५, दि. १६.०८.२०२४

(३) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. क्र.अमवि/२०२४/ई-कुबेर/ई.फा.क्र.१९१५४२९/जवि/मवि-२, दि.२५.०८.२०२५

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील राज्यातील अकृषी विद्यापीठे, अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अनुदानित अभिमत विद्यापीठे व तंत्र शिक्षण मंडळे यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन भत्त्याची देयके अदा करण्यासाठी एचटीई सेवार्थ प्रणाली कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये वित्त विभागाने सर्व जिल्हा कोषागार कार्यालये व उपकोषागार कार्यालये यांच्यामार्फत होणारे सर्व शासकीय प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई -कुबेर प्रणालीमार्फत करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त एचटीई सेवार्थ प्रणालीचे इंटिग्रेशन वित्त विभागाच्या बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई -कुबेर प्रणाली समवेत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त एचटीई सेवार्थ प्रणालीचे इंटिग्रेशन वित्त विभागाच्या बीम्स/बील पोर्टल आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई -कुबेर प्रणाली समवेत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. एचटीई सेवार्थ प्रणालीचे इंटिग्रेशन ई -कुबेर प्रणालीसमवेत केल्यानंतर नवीन प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी संबंधित कर्मचा-यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी संचालक, लेखा व कोषागरे यांच्या सहकार्याने करावी.

३. प्रस्तुत सुधारित एचटीई सेवार्थ प्रणालीचे कार्यान्वयन करण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, महाआयटी तसेच राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) यांच्याशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी करावी.

४. सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार अधिकारी यांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

५. सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२०/२०२४/कोषा.प्रशा-५, मधील निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

६. सदर शासन परिपत्रक वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७/२०२६/को.प्र.५, दि. ०९.०१.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०३०६१७०८४१४३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT S PATHAK

Digitally signed by HEMANT S PATHAK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d1ed32de1e3eda84d0c03040473905e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EE03447853A43CF2A3547CBC186E49802A70EF183CF488073E81785E6AD171A6, cn=HEMANT S PATHAK
Date: 2026.03.06 17:10:27 +05'30'

**(हे. सु. पाठक)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. मा. महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर १.
९. मा. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
१०. संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला संचालनालय
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी
१३. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई,
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. वित्त विभाग (कोषा प्रशा-५/व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती-मशि-२

**सेवार्थ प्रणालीतील अधिकारी/कर्मचारी यांचे ई-केवायसी पूर्ण करणेबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४**
दालन क्रमांक ३३९, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २७ मार्च, २०२६

**प्रस्तावना -**

सेवार्थ प्रणालीमध्ये सर्व नियमित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती भरण्यात आलेली आहे. सदर माहितीनुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन आहरीत होत असते. सदर माहितीमध्ये त्यांच्या बँक खात्याच्या माहितीसोबतच संबंधित कर्मचाऱ्यांचा PAN क्रमांक, आधार क्रमांक नोंदविलेला आहे. एकंदरीतच पूर्ण माहितीमध्ये कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांची दुबार माहिती सेवार्थ प्रणालीत नोंद होऊ नये तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास दुबार वेतन अदा होऊ नये, याकरीता शासनाने ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन, सर्व प्रशासकीय विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

१. सेवार्थ प्रणालीत वेतन घेणाऱ्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहे एप्रिल, २०२६ देय मे, २०२६ या वेतन देयकाअगोदर ई-केवायसी पूर्ण करावयाची आहे. **सदर ई-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२६ देय माहे मे, २०२६ चे वेतन आहरीत करण्यात येणार नाही.**

२. सदर ई-केवायसी पूर्ण करण्यापूर्वी अधिकारी/कर्मचारी यांच्या बॅक खात्याशी आधार क्रमांक संलग्न असलेले बँक खाते सेवार्थ प्रणालीत अद्ययावत केले असले पाहिजे. सेवार्थ प्रणालीत उपलब्ध असलेले बँक खाते आधार क्रमांकांशी संलग्न नसेल तर असे खाते त्वरीत बदलण्यात येऊन सेवार्थ प्रणालीत आधार क्रमांकांशी संलग्न असलेले बँक खाते अद्ययावत करण्यात यावे.

३. तसेच सेवार्थ प्रणालीत नोंदविलेला PAN क्रमांक चूकीचा असल्यास, नोंदविण्यात आलेला PAN क्रमांकाची दुरुस्ती करुन अद्ययावत करण्यात यावा.

४. सदर ई-केवायसी प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी व्यक्तिशः पूर्ण करुन त्याचे प्रमाणपत्र आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे जमा करावयाचे आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सेवार्थ प्रणालीत देण्यात आलेल्या ई-केवायसी अपडेशन रिपोर्टमध्ये सदर अधिकारी/ कर्मचारी यांची नोंद करावयाची आहे. सदर नोंद करतांना ई-केवायसी अन्वये पडताळणी करण्यात आलेला बॅक खात्याचा तपशील व सेवार्थ प्रणालीत नोंदविण्यात आलेला बँक तपशील या दोहोंमध्ये साम्य असल्यासच सदर नोंद घेण्यात यावी अन्यथा प्रथम ई-केवायसी केल्याप्रमाणे सेवार्थ प्रणालीत बँक खात्याचा तपशील अद्ययावत करावा.

२. तसेच सदरचे परिपत्रक हे सर्व जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, शालेय शिक्षण विभाग (शालार्थ प्रणाली), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्लित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये, कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्लित मान्यता प्राप्त व अनुदानित महाविद्यालये/संस्था, अदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा व संस्था, वैद्यकीय विद्यापीठ उच्च व तंत्र शिक्षण/कौशल्य विकास विभागाच्या अधिनस्त संस्था, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील संस्था यांनादेखील लागू राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०३२७१४४१५६७००५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK GULAB CHAUDHARI

Digitally signed by ASHOK GULAB CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=3A31F1E61A49658347833C8C22A09CB8141A51CF08DA760FD5E2A1B3C1769153, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3E9FA04602558FF79EC2FCB3553E7DA28D75751FAA9AA5AA2261D3E69F011558, cn=ASHOK GULAB CHAUDHARI
Date: 2026.03.27 14:43:27 +05'30'

**( अशोक चौधरी )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**१. सर्व आहरण व संवितरण अधिकारी (सेवार्थ) / सर्व आहरण व संवितरण अधिकारी (कस्टमाईज्ड सेवार्थ)**
**२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग**
**३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.**
**४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.**
**५. सर्व उप कोषागार अधिकारी.**

*** प्रत कार्यवाहीस्तव-**

**मे. महाआयटी, तिसरा मजला, अेपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई-४०००२०**

यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणालीतील वापरकर्त्यांकरीता उपरोक्तप्रमाणे केवायसी केल्यानंतर प्रणालीमध्ये केवायसी नोंद करण्यासाठी सुविधा निर्माण करुन देण्याची कार्यवाही करावी.

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई

१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/ नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/ नागपूर
२९. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०. निवड नस्ती/कोषा प्रशा-४